राष्ट्रीय सेवा योजना (वरिष्ठ)

सत्र सुरुवातीला राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून आवेदनपत्र मागविण्यात आले व विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षात घेऊन प्रवेश निश्चित करण्यात आले.

⇨ दिनांक १० ते १६ जूनला राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहूरी जि. अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली होती.

⇨ १ ऑगस्ट २०१२ ला लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती हे कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

⇨ ९ ऑगस्ट २०१२ ला क्रांती दिनानिमित्त उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले.

⇨ १८ ऑगस्ट २०१२ ला वसंतराव नाईक पुण्यतिथी निमित्त बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसद येथे १२ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

⇨ २१ ऑगस्ट २०१२ ला कै. सुधाकरराव नाईक जयंती निमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.

⇨ २८ व २९ ऑगस्ट २०१२ ला विद्यापीठ स्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा व प्रजासत्ताक दिन संचालन निवड चाचणी अमरावती येथे आयोजित करण्यात आले होते.

⇨ २९ ऑगस्ट २०१२ ला रेड-रिबीन क्लब तर्फे युवा मॅरेथॉन रॅली ओजित करण्यात आली होती. यामध्ये एकूण १०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

⇨ ३ सप्टेंबर २०१२ ला कै. फुलसिंग बापू यांच्या पुण्यतिथी निमित्त प्राचार्य डॉ. संजीव मोटके यांच्या उपस्थितीत महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला.

⇨ ५ सप्टेंबर २०१२ ला शिक्षक दिनानिमित्त महाविद्यालयामधील ज्येष्ठ प्राध्यापक श्री. व्ही.एस. खर्चे व आचार्य पदवी प्राप्त केल्याप्रित्यर्थ प्रा. डॉ. ए.पी. मुडे व प्रा. डॉ. हेमंत महल्ले यांचा सत्कार करण्यात आला.

⇨ २४ सप्टेंबर २०१२ ला राष्ट्रीय सेवा योजना दिवसानिमित्त अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली.

⇨ २५ सप्टेंबर २०१२ ला **बेटी बचाओ अभियान** रॅली तसेच कविता, पोस्टर या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली.

⇨ २९ सप्टेंबर २०१२ ला गणेश विसर्जनाच्या वेळी निर्माल्य कळस गोळा करण्याकरिता स्थानिक पुस नदीच्या तीरावर ५० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

⇨ २ ऑक्टोबर २०१२ ला महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात एक दिवसीय श्रमदान शिबीर आयोजित करून परिसराची स्वच्छता करण्यात आली.

⇨ १९ ऑक्टोबर २०१२ ला राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्‌बोधन वर्ग आयोजित करण्यात आले. याप्रसंगी क्षेत्रीय समन्वयक प्रा. प्रदीप दुधाट यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे उद्देश, महत्त्व स्वयंसेवकांना पटवून दिले.

⇨ २० ऑक्टोबर २०१२ ला जिल्हा स्तरीय आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा यवतमाळ येथे आयोजित करण्यात आली.

⇨ २७ ऑक्टोबर २०१२ ला राष्ट्रीय युवा संघटन १३ वे राज्यस्तरीय शिबीर ता. राळेगांव जि. यवतमाळ येथे आयोजित करण्यात आले.

⇨ ३१ ऑक्टोबर २०१२ ला रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले.

⇨ ५ ते ७ नोव्हेंबर २०१२ ला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे छात्रसंघ सचिवाची कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

⇨ पूर्व प्रजासत्ताक संचालन चाचणी शिबीर पुणे येथे दि. ११ ते १४ डिसेंबर २०१२ ला आयोजित करण्यात आले होते. यामधील सहभागी स्वयंसेविका कु. काजल चंद्रभान नगराळे बी.ए. भाग २ ही होती.

⇨ १७ ते १९ डिसेंबर २०१२ ला **नॅक** समितीने मूल्यांकन केले. त्यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेचे नियमित व विशेष शिबीराचे कार्यक्रम दाखविण्यात आले. याप्रसंगी स्वयंसेवकांनी आपले मनोगतसुद्धा व्यक्त केले.

⇨ राज्यस्तरीय प्रजासत्ताक दिन संचालनासाठी आपल्या महाविद्यालयातील स्वयंसेविका कु. काजल चंद्रभान नगराळे बी.ए. भाग २ हिने दि. ११ ते २६ जानेवारी २०१३ मुंबई येथे सहभाग नोंदविला.

विशेष शिबीर अहवाल २०१२- १३

फुलसिंग नाईक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दिनांक ५ ते १२ जानेवारी २०१३ पर्यंत मौजे पिंपळखुटा ता. पुसद जि. यवतमाळ येथे ७ दिवसीय विशेष शिबीर उत्साहात संपन्न झाले.

- ⇨ शनिवार– ५ जाने. २०१३ दुपारी २.०० वा. शिबीरार्थ्यांचे शिबीरस्थळी आगमन झाले. शिबीर परिसर स्वच्छता व राहण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर सायं. ५.०० वा. प्रकल्पाची पाहणी व दुसऱ्या दिवसाच्या श्रमदानाची तयारी तसेच गावकऱ्यांशी चर्चा करण्यात आली.
- ⇨ रविवार– ६ जानेवारी २०१३ सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत ग्रामस्वच्छता करण्यात आली व दुपारी २.०० वाजता आयोजिठत शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.
- ⇨ सोमवार– ७ जानेवारी २०१३ सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत संधीवात, गुडघेदुखी, आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.
- ⇨ मंगळवार– ८ जानेवारी २०१३ सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत स्त्रीरोग निदान आणि श्रमदान घेण्यात आले.
- ⇨ बुधवार– ९ जानेवारी २०१३ सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत पशुचिकित्सक शिबीर घेण्यात आले. या शिबीरात ९८ पशुंची तपासणी करण्यात आली. दुपारच्या बौद्धिक सत्रात राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून **व्यक्तिमत्त्वाचा विकास** या विषयाावर परिसंवाद घेण्यात आला.
- ⇨ गुरुवार– १० जानेवारी २०१३ सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत बालरोग निदान शिबीर व श्रमदान घेण्यात आले.
- ⇨ शुक्रवार– ११ जानेवारी २०१३ सकाळी ९ ते १२ वाजेपर्यंत वृक्षारोपण व श्रमदान झाले. त्यानंतर दुपारच्या बौद्धिक सत्रात महिला बचत गट मार्गदशन या विषयावर परिसंवाद पार पडला.
- ⇨ शनिवार– १२ जानेवारी २०१३ सकाळी ९.०० वा. राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त गावात व तांड्यात रॅली काढण्यात आली. याप्रसंगी स्वामी विवेकानंद व राष्ट्रमाता जिजाऊ यांचे संदेश स्लोगनच्या माध्यमातून पोहचविण्याचे काम स्वयंसेवकांनी केले. तसेच दुपारच्या सत्रात समारोप समारंभ व बक्षिस वितरणाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर सायं. ५.३० वा. गावकऱ्यांचा व गावातील प्रतिष्ठित नागरिकांचा निरोप घेण्यात आला.

प्रा. डी. बी. पवार
कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना

राष्ट्रीय सेवा योजना (वरिष्ठ)

नियमित रासेयो अहवाल

सत्रारंभी राष्ट्रीय सेवा योजनेमध्ये प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून आवेदनपत्र मागविण्यात आले व विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षात घेऊन प्रवेश निश्चित करण्यात आले.

- ⇨ २४ जुलै २०१३ ला श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद येथे हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक जन्मशताब्दीचे औचित्य साधून '**शेतकरी कारखानदार झालाच पाहिजे**' निबंध स्पर्धेचे आयोजन केले. त्यामध्ये महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी भाग घेतला.
- ⇨ २७ जुलै २०१३ ला श्रीमती वत्सलाबाई नाईक महिला महाविद्यालय, पुसद येथे हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांच्या जन्मशताब्दी वर्ष पूर्णत्वानिमित्त वक्तृत्त्व स्पर्धेत रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदिवला.
- ⇨ १ ऑगष्ट २०१३ ला लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- ⇨ ९ ऑगष्ट २०१३ ला क्रांतीदिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला
- ⇨ १५ ऑगष्ट २०१३ ला स्वातंत्र्यदिनानिमित्त '**हरितपर्व २०१३**' अंतर्गत महाविद्यालय परिसरात वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.
- ⇨ १८ ऑगष्ट २०१३ ला स्व. वसंतराव नाईक पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमाकरिता बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसद येथे १५ स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.
- ⇨ २१ ऑगष्ट २०१३ ला स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंती निमित्ताने एक दिवशीय श्रमदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.
- ⇨ ३० ऑगष्ट २०१३ ला महाविद्यालय परिसरात '**हरित पर्व २०१३**' चा दुसऱ्या टप्प्यातील वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.
- ⇨ ३ सप्टेंबर २०१३ ला कै. फुलसिंगजी बापू यांच्या पुण्यतिथी निमित्त '**हरितपर्व २०१३**' अंतर्गत तिसरा व अंतिम टप्प्यातील वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला.
- ⇨ ५ सप्टेंबर २०१३ ला शिक्षक दिनाचा कार्यक्रम घेऊन महाविद्यालयातील ज्येष्ठ व आचार्य पदवी मिळाल्या बद्दल दोन प्राध्यापकांचा सत्कार घेण्यात आला.
- ⇨ १४ सप्टेंबर २०१३ ला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे '**उत्कर्ष**' सामाजिक व सांस्कृतिक स्पर्धेसाठी दोन स्वयंसेवकांनी भाग घेतला. १५ व १६ सप्टेंबर २०१३ ला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे गणतंत्रदिन पथ संचलनाकरिता निवड चाचणीसाठी दोन स्वयंसेवक पाठविण्यात आले.
- ⇨ १८ सप्टेंबर २०१३ ला गणेश विसर्जनानिमित्त निर्माल्य गोळा करण्याकरिता २० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.
- ⇨ २१ ते २३ सप्टेंबर २०१३ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद येथे राज्य व राष्ट्रीय स्तरावरिल प्रजासत्ताक पूर्व पथसंचालन शिबीराला रासेयो स्वयंसेवक मनोज रामजी राठोड, बी.ए. २ या विद्यार्थ्याने सहभाग घेतला.
- ⇨ २४ सप्टेंबर २०१३ ला राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त '**पर्यावरण जनजागृती**' या विषयावर उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले.
- ⇨ ११ ऑक्टो. १३ ला माहिती अधिकार सप्ताह साजरा करण्याच्या दृष्टीने '**माहितीचा अधिकार २००५**' या विषयावर निबंधस्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

- ➪ २३ ऑक्टोबर २०१३ ला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती येथे सरपंच, पोलीस पाटिल व महिला बचत गट कार्यशाळेला दत्तकग्राम पिंपळखुटा येथील सरपंच, पोलीस पाटिल यांना पाठविण्यात आले.
- ➪ ६ डिसेंबर २०१३ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- ➪ ३ जानेवारी २०१४ ला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- ➪ ४ फेब्रुवारी २०१४ ला पंचायतराज प्रशिक्षण केंद्र, पुसद व फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद यांच्या संयुक्त विद्यमाने रासेयो तर्फे **'पंचायत राज व युवक'** या विषयाच्या अनुषंगाने एक दिवसाची कार्यशाळा घेण्यात आली.

विशेष शिबीर अहवाल

वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. १८ जाने. ते २५ जाने. २०१४ पर्यंत मौजा पिंपळखुटा (दत्तकग्राम) पो. बान्सी ता. पुसद जि. यवतमाळ येथे ७ दिवशीय निवासी विशेष ग्रामीण शिबिराचे आयोजन करून उत्साहात संपन्न झाले.

- ➪ १८ जाने.२०१४ रोजी सर्व शिबीरार्थ्यांचे शिबीरस्थळी आगमन झाले. शिबीर परिसराची स्वच्छता व राहण्याची व्यवस्था करण्यात आली. श्रमदानाविषयी प्रकल्प पाहणी व गावकऱ्यांशी चर्चा करण्यात आली.
- ➪ १९ जाने.२०१४ रोजी विशेष शिबिराचे रितसर उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके होते तर उद्घाटक म्हणून डॉ. गणेश पाटील यांची उपस्थिती होती.
- ➪ २० जाने. २०१४ रोजी स्त्रीरोग निदान शिबीर घेण्यात आले. यावेळी स्त्रीयांना आरोग्य व आहार विषयक मार्गदर्शन डॉ. सुनिता हळदे, स्त्रीरोग तज्ज्ञ, पुसद यांनी केले.
- ➪ २१ जाने.२०१४ रोजी रासेयो स्वयंसेवकांनी श्रमदान केले. यामध्ये गावातील साफसफाईचे काम करण्यात आले. दुपारी **'युवकांच्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या दिशा'** याविषयावर प्रा. के. एस. अलेक्झांडर यांनी मार्गदर्शन केले.
- ➪ २२ जाने. २०१४ रोजी **बेटी बचाओ, ग्रामस्वच्छता व एडस् जनजागरण** रॅलीचे आयोजन करण्यात आले. रॅलीचे नेतृत्त्व प्रा. वसंत कांबळे व प्रा. कु. अनीता कांबळे यांनी केले.
- ➪ २३ जाने. २०१४ रोजी रक्तगट तपासणी शिबीर घेण्यात आले. यावेळी डॉ. जे. एफ. वाढवे (एम.डी. पॅथॅलॉजी) यांनी १०० स्वयंसेवकांची व गावकऱ्यांची रक्त तपासणी केली व त्यासंदर्भात मार्गदर्शन केले.
- ➪ २४ जाने. २०१४ रोजी पशुचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबीरात सुमारे २०० पशुंची चिकित्सा करून औषधोपचार करण्यात आला. यावेळी डॉ. अशोक राठोड व डॉ. पी.एन. राठोड (पशुधन विकास अधिकारी, पं. सं. पुसद) यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.
- ➪ २५ जाने. २०१४ रोजी **'ग्रामवृक्ष लागवड'** हा कार्यक्रम घेऊन **'एक घर-एक झाड'** याविषयी स्वयंसेवकांनी गावतील प्रत्येक घरी जाऊन महत्त्व पटवून दिले.

दुपारी शिबीराचा समारोप समारंभ झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके, उपप्राचार्य प्रा. हरिश गजभिये, तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. अभय जोशी, गोपीकाबाई सीताराम गांवडे महाविद्यालय, उमरखेड यांची उपस्थिती होती. यावेळी प्रा. प्रदीप दुधाट, क्षेत्रीय समन्वयक यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. सायं. ५.३० वाजता गावकऱ्यांचा व गावातील प्रतिष्ठित नागरिकांचा निरोप घेण्यात आला.

प्रा. व्ही. एन. कांबळे,
रासेयो कार्यक्रम अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजना (वरिष्ठ)

नियमित अहवाल

सत्रारंभी राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये स्वयंसेवक म्हणून प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून आवेदनपत्र मागविण्या करिता सूचना काढून आवेदनपत्र मागविण्यात आले व विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षात घेऊन प्रवेश निश्चित करण्यात आले.

- १ ऑगस्ट २०१४ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त महाविद्यालयात दोन्ही महामानवांना अभिवादन करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके यांची उपस्थिती होती.
- ९ ऑगस्ट २०१४ रोजी क्रांती दिन साजरा करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हरिश गजभिये यांची प्रमुख उपस्थिती होती.
- १२ ऑगस्ट २०१४ रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिनाचे औचित्य साधून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी उपप्राचार्य प्रा. हरिश गजभिये यांची उपस्थिती होती.
- १५ ऑगस्ट २०१४ रोजी स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमा करिता राष्ट्रीय सेवा योजना पथकाच्या वतीने देशभक्तीपर गीत गायन स्पर्धा घेण्यात आली.
- १८ ऑगस्ट २०१४ रोजी स्व. वसंतरावजी नाईक पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमाकरिता बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसद येथे ३० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला व संपूर्ण दिवस विविध कार्यक्रमाकरिता स्वयंसेवक म्हणून सहकार्य केले.
- १९ ऑगस्ट २०१४ रोजी प्रचलित सत्राकरिता राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले. उद्‌बोधन वर्गाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हरिश गजभिये होते. तर प्रमुख पाहुणे व मार्गदर्शक म्हणून रा. से. यो. क्षेत्रिय समन्वयक प्रा. प्रदीप दुधाट, बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसद यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा. वसंत कांबळे यांनी केले. आभार डॉ. प्रियंका गायकवाड यांनी मानले.
- २१ ऑगस्ट २०१४ रोजी स्व. सुधाकररावजी नाईक जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी एक दिवसीय श्रमदान शिबीराचे आयोजन करण्यात आले.
- ३ सप्टेंबर २०१४ रोजी कै. फुलसिंगजी बापू यांच्या पुण्यतिथी निमित्त प्राचार्य डॉ. संजीव मोटके यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला.
- ५ सप्टेंबर २०१४ रोजी शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील ज्येष्ठ प्राध्यापक हरिश गजभिये, उपप्राचार्य व ग्रंथालय विभागातील ग्रंथालय परिचर श्री. राहुल धुळधुळे यांनी ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयात आचार्य पदवी प्राप्त केल्याप्रित्यर्थ यांचा शाल, श्रीफळ देऊन विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.
- ७ सप्टेंबर २०१४ रोजी गणपती विसर्जनानिमित्त निर्माल्य गोळा करण्यासाठी पुसनदी तीरावर रा.से.यो. स्वयंसेवकांच्या मदतीने नदीचे पावित्र्य राखण्याच्या दृष्टीने कार्य करण्यात आले. यावेळी ४० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.
- १८ सप्टेंबर २०१४ रोजी जि. प. यवतमाळ येथे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत मुख्याधिकारी, जि. प. यवतमाळ यांनी सभेचे आयोजन केले. यामध्ये कार्यक्रम अधिकारी प्रा. वसंत कांबळे व दोन स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.
- २४ सप्टेंबर २०१४ रोजी रा.से.यो. दिना निमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके यांच्या प्रमुख उपस्थितीत रासेयो दिन साजरा करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हरिश गजभिये व क्षेत्रीय समन्वयक प्रा. प्रदीप दुधाट यांची उपस्थिती होती.
- २ आक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधी जयंती निमित्त महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी स्वच्छता अभियान राबविण्यात आले.
- ४ आक्टोबर २०१४ रोजी दुर्गादेवी विसर्जनाच्या वेळी पुस नदीकाठी निर्माल्य गोळा करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकाच्या वतीने निर्माल्य गोळा करून नदी प्रदूषण मुक्तीसाठी महत्वपूर्ण योगदान दिले.

१ डिसेंबर २०१४ रोजी पुसद परिसरातील मुख्य चौकातून एडस् जनजागृती रॅली काढण्यात आली. रॅलीला पुसद शहरातील बहुतांश शैक्षणिक संस्थांचा सहभाग होता.

- ६ डिसेंबर २०१४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्माण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हरिश गजभिये यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रा. डॉ. अनिल मुडे, प्रा. पी. आर. बोरकर, डॉ. प्रल्हाद वावरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- ३ जानेवारी २०१५ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
- २६ जानेवारी २०१५ रोजी प्रजासत्ताक दिना निमित्त महाविद्यालयात ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. तद्नंतर राष्ट्रीय सेवा योजना पथकातील सर्व स्वयंसेवकांचे सामूहिक छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

१९ फेब्रुवारी २०१५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त रासेयो पथकाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

२८ फेब्रुवारी २०१५ रोजी संत गाडगेबाबा जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करून महाविद्यालय परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

वरीलप्रमाणे विविध कार्यक्रमांचे महाविद्यालय स्तरावर आयोजन करून रासेयो पथकाच्या सर्व स्वयंसेवकांनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवून शैक्षणिक सत्र २०१४-१५ मधील सर्व प्रासंगिक कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केले.

प्रा. व्ही.एन.कांबळे/ डॉ. प्रियंका गायकवाड

कार्यक्रम अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजना, पुसद



विशेष शिबीर अहवाल

वरिष्ठ महाविद्यालयातील रासेयो विभागाच्या वतीने दि. १८ ते २५ जाने. २०१५ पर्यंत मनसळ (दत्तकग्राम) ता. पुसद जि. यवतमाळ येथे ७ दिवसीय निवासी विशेष ग्रामीण शिबीराचे आयोजन करून उत्साहात संपन्न झाले.

१८ जाने. २०१५ रोजी सर्व शिबीरार्थ्यांचे शिबीर स्थळी आगमन झाले. शिबीर परिसराची स्वच्छता व राहण्याची व्यवस्था करण्यात आली. श्रमदानाविषयी प्रकल्प पाहणी व गावकऱ्यांशी चर्चा करण्यात आली.

१९ जाने. २०१५ रोजी विशेष शिबीराचे रितसर उद्घाटन करण्यात आले. उद्घाटन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके होते. तर उद्घाटक म्हणून चंद्रकांत जाजू, उपविभागीय अधिकारी, पुसद यांची उपस्थिती होती.

२० जाने. २०१५ रोजी स्वकथनकारांचा विद्यार्थ्यांशी सुसंवाद या विषयावरती मा. श्री. नामदेव राठोड, वादळ-वाराकार, पुसद व प्रा. विलास भवरे, फु. ना. महा., पुसद यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

२१ जाने. २०१५ रोजी **रक्तगट तपासणी शिबीर** घेण्यात आले. यावेळी प्रा. जे.एस. खान व डॉ. एस.एन. खाडे यांनी ११५ स्वयंसेवकांची व गावकऱ्यांची रक्त तपासणी केली व त्या संदर्भात मार्गदर्शन केले.

२२ जाने. २०१५ रोजी नेत्र तपासणी शिबीरांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. जय भोपी नेत्ररोग तज्ज्ञ, पुसद यांनी १३० स्वयंसेवकांची व गावकऱ्यांचे नेत्र तपासणी केली व त्या संदर्भात मार्गदर्शन केले.

२३ जाने. २०१५ रोजी रासेयोच्या स्वयंसेवकांनी श्रमदान केले. तसेच दुपारच्या सत्रात रासेयोच्या माध्यमातून व्यक्तिमत्व विकास या विषयावर प्रा. निवृत्ती पिस्तुलकर रासेयो., जिल्हा समन्वयक, श्री. महंत दत्तराम भारती महाविद्यालय, आर्णी व प्रा. प्रदीप दुधाट रा.से. यो. क्षेत्रीय समन्वयक, पुसद यांनी मार्गदर्शन केले.

२४ जाने. २०१५ रोजी **स्त्रीरोग निदान** शिबीर घेण्यात आले. यावेळी स्त्रियांना आरोग्य व आहार विषयक मार्दर्शन डॉ. सुनिता हळदे, स्त्रीरोग तज्ज्ञ, पुसद यांनी केले.

२५ जाने. २०१५ रोजी पशुचिकित्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबीरात सुमारे १४० पशुंची चिकित्सा करून औषधोपचार करण्यात आले. यावेळी डॉ. पी.

एन. राठोड, तालुका पशुधन विकास अधिकारी, पं. स. पुसद यांनी ग्रामस्थांना मार्गदर्शन केले.

दुपारी शिबीराचा समारोप समारंभ झाला. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके, उपप्राचार्य प्रा. हरीश गजभिये व प्रा. डॉ. विनोद सोंदनकर तर प्रमुख पाहुणे श्री. आर. व्ही. सोनोने, पोलीस निरीक्षक, पो.स्टे. पुसद (शहर) यांची उपस्थिती होती. यावेळी श्री. प्रविण नाईक, तुकाराम उघडे, सामाजिक कार्यकर्ता व विजय विश्वकर्मा, मुख्याध्यापक, प्रा. शाळा, मनसळ यांनी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन केले.

सायं. ५.३० वाजता गावकऱ्यांचा व गावातील प्रतिष्ठित नागरिकांचा निरोप घेण्यात आला.

डॉ. कु. प्रियंका गायकवाड **प्रा. व्ही. एन. कांबळे**

रा.से. यो. कार्यक्रम अधिकारी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजना

सत्रारंभी राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये स्वयंसेवक म्हणून प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून आवेदन पत्र मागविण्याकरिता सूचना काढून आवेदनपत्र मागविण्यात आले व विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षात घेऊन प्रवेश निश्चित करण्यात आले.

दिनाक : १ ऑगस्ट २०१५

लोकमान्य टिळक पुण्यतिथी व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त महाविद्यालयात दोन्ही महामानवांना अभिवादन करण्यासाठी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमांच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके यांची उपस्थिती होती.

दि. १४ ऑगस्ट २०१५

स्वातंत्र्यदिनाची पूर्व तयारी व प्रांगण स्वच्छतेचा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हरिश गजभिये यांची उपस्थिती होती.

दि. २५ ऑगस्ट २०१५

स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजारोहन आणि रा.से.यो. च्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्राचार्य डॉ. संजीव मोटके, उपप्राचार्य डॉ. विनोद सोंदणकर, प्रा. हरीश गजभिये तसेच कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य शंकर चव्हाण यांची उपस्थिती होती.

दि. १८ ऑगस्ट २०१५

स्व.वसंतरावजी नाईक पुण्यतिथीनिमित्त आयोजित कार्यक्रमाकरिता बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसद येथे ३५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला व संपूर्ण दिवस विविध कार्यक्रमाकरिता स्वयंसेवक म्हणून सहकार्य केले.

दि. २१ ऑगस्ट २०१५

स्व. सुधाकररावजी नाईक जयंती निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी जलसंधारण या विषयांवर एकदिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयाचे जलसंधारणाचे अभ्यासक प्रा. पि.ओ. मोदानी, प्राचार्य डॉ. संजीव मोटके, उपप्राचार्य प्रा. हरिश गजभिये, डॉ. संजय भोयर, प्रा. दिनकर गुल्हाणे यांची उपस्थिती होती.

दि. २ सप्टेंबर २०१५

एक दिवशीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हरीश गजभिये तसेच पवन शर्मा यांची उपस्थिती होती.

दि. ३ सप्टेंबर २०१५

कै. फुलसिंगजी नाईक यांच्या पुण्यतिथी निमित्त स्वच्छता अभियान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार प्रा. न.मा. जोशी, कृषिभूषण दीपक आसेगांवकर, उपप्राचार्य प्रा. हरीश गजभिये, डॉ.पी.पी. देशमुख, प्राचार्य डॉ. संजीव मोटके, प्रा. दिनकर गुल्हाणे, प्रा. एस.जी.चव्हाण यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रियंका गायकवाड यांनी केले.

दि. ५ सप्टेंबर २०१५

वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, यवतमाळ तसेच उपजिल्हा रुग्णालय, पुसद व फु.ना महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त भव्य रक्तदान कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी अध्यक्षस्थानी डॉ. जे.एन.सूर्यवंशी वैद्यकीय अधीक्षक, उपजिल्हा रुग्णालय, पुसद, डॉ. वीणा धुर्वे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके आदिंची उपस्थिती होती.

- रा.से.यो. दिनाचे औचित्य साधून रा.से.यो. विभागातर्फे व उपप्राचार्य प्रा. हरीश गजभिये यांनी हासरे घरकुल अनाथाश्रमाला फळवाटप व पंखा भेट देऊन अनाथालयातील मुलांशी संवाद साधला.

- तसेच रा.से.यो. दिनानिमित्त उद्‌बोधन वर्गाचे आयोजन

करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजीव मोटके होते तर प्रमुख पाहुणे प्रा. दिनकर गुल्हाणे तर मार्गदर्शक म्हणून उपप्राचार्य प्रा. हरीश गजभिये उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. प्रियंका गायकवाड यांनी केले तर आभार रा.से.यो. स्वयंसेवक शशांक खंदारे यांनी मानले.

दि. २ ऑक्टोबर २०१५

महात्मा गांधी आणि लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. २६ नोव्हेंबर २०१५

भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना भारतीय संविधान प्रती देण्यात आल्या. यावेळी प्राचार्य डॉ. संजीव मोटके, उपप्राचार्य प्रा. हरीश गजभिये यांची उपस्थिती होती.

दि. २८ नोव्हेंबर २०१५

महात्मा फुले स्मृतिदिना निमित्त निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले उपप्राचार्य प्रा.हरीश गजभिये, प्रा. मुडे यांची उपस्थिती होती.

दि. १ डिसेंबर २०१५

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. हरीश गजभिये, प्रा. मुडे, डॉ. प्रल्हाद वावरे यांची उपस्थिती होती.

१० डिसेंबर २०१५

संत गाडगेबाबा पुण्यतिथी निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

३१ डिसेंबर २०१५

तंबाखुमुक्त जीवन संकल्प दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ.हरीश गजभिये, डॉ. अनिल मुडे, डॉ. संजय भोयर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रियंका गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. आनंद वडवळे यांनी मानले.

दि. ३ जानेवारी २०१६

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमीत्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

दि. १२ जानेवारी २०१६

राष्ट्रीय युवादिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले यावेळी उपप्राचार्य प्रा. हरीश गजभिये यांची प्रमुख उपस्थिती होती तसेच प्रा. विजय राठोड यांचीही उपस्थिती होती.

दि. २६ जानेवारी २०१६

प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम संपन्न झाला. नंतर राष्ट्रीय सेवा योजना पथकातील सर्व स्वयंसेवकांचे सामुहिक छायाचित्र काढण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.

दि. १७ फेब्रुवारी २०१६

शिवजयंती निमित्त गीतगायन आणि वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

दि. १९ फेब्रुवारी २०१६

शिवजयंती साजरी करण्यात आली. शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी उपप्राचार्य प्रा. हरीश गजभिये, प्रा. प्रवीण हमजादे व डॉ. सुनिल खाडे यांची उपस्थिती होती.

दि. २३ फेब्रुवारी २०१६

संत गाडगेबाबा यांच्या जयंतिनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके, प्रा. उल्हास चव्हाण आदिंची उपस्थिती होती.

दि. २९ फेब्रुवारी २०१६

बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समिती, पुसद द्वारे आयोजित एकदिवशीय कार्यशाळेमध्ये कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रियंका गायकवाड व पंचवीस स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

विशेष ग्रामीण शिबीर अहवाल

फुलसिंग नाईक महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. १८ जानेवारी २०१६ ते २५ जानेवारी २०१६ पर्यंत मौजे मनसळ, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे ७ दिवसीय विशेष ग्रामीण निवासी शिबीराचे आयोजन करून उत्साहात संपन्न झाले.

सोमवार, १८ जानेवारी २०१६

शिबीराथ्यांचे शिबीरस्थळी आगमन झाले. शिबीर परीसराची स्वच्छता व राहण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर गावकऱ्यांसोबत श्रमदानाविषयी चर्चा करण्यात आली. या दिवशी रात्री स्वयंसेवकांचे विविध गट करण्यात आले व त्यांना सात दिवसात कोणकोणते कार्य पार पाडावयाचे आहे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

मंगळवार, १९ जानेवारी २०१६

सकाळी ७.३० ते दु. १२.०० या दरम्यान श्रमदान करण्यात आले. दुपारी भोजनानंतर उद्घाटन समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला मा.डॉ. संजीवजी मोटके अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. नीतिनकुमार हिंगोले, उपविभागीय अधिकारी, पुसद यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून सौ. वनिता उघडे (पोलीस पाटील, मनसळ), श्रीमती सुंदराबाई उघडे (उपसरपंच, मनसळ), प्रा. हरीश गजभिये, उपप्राचार्य, फुलसिंग नाईक महाविद्यालय, श्री. विजय विश्वकर्मा, मुख्याध्यापक जिल्हा परिषद शाळा, मनसळ व कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. प्रियंका गायकवाड, प्रा. आनंद वडवळे हे उपस्थित होते.

बुधवार, २० जानेवारी २०१६

सकाळी ७.३० ते दु. १२.०० दरम्यान स्मशान भुमीची साफ सफाई व स्वच्छता श्रमदानाच्या माध्यमातून करण्यात आली. दुपारी बौद्धिक सत्रात व्यक्तिमत्त्व विकास या विषयावर प्रा. बी.एस. मनगटे व प्रा. एस.आर.भोयर यांनी विद्यार्थ्यांना अतिशय मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. आनंद वडवळे हे होते.

गुरुवार, २१ जानेवारी २०१६

सकाळी ७.३० ते ९.३० दरम्यान श्रमदान करण्यात आले. सकाळी ९.३० वाजता डॉ. जय भोपी, श्री वरद नेत्रालय, पुसद यांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली व त्यांना औषधींचे वाटप करण्यात आले. डॉ. भोपी यांनी गावकऱ्यांना व विद्यार्थ्यांना डोळ्यांचे आजार व त्याविषयी घ्यावयाची काळजी याबाबत महत्त्वाचे मार्गदर्शन केले.

दुपारी २.०० वाजता सत्रांतर्गत व्यसनाधीनता आणि महिला अत्याचार प्रतिबंधात्मक उपाय या विषयावर विद्यार्थ्यांशी ॲड. छायाताई देशमुख यांनी संवाद साधला. यावेळी विद्यार्थीनींना कायद्याच्या माध्यमातून कशा प्रकारे संरक्षण मिळविता येते याबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. सुधा जोशी मॅडम उपस्थित होत्या.

शुक्रवार, २२ जानेवारी २०१६

सकाळी ७.३० ते ९.३० या वेळेत श्रमदान करण्यात आले. यानंतर ९.३० वाजता बाल आरोग्य व पोषणविषयक मिशन या शिबीरांतर्गत कार्यक्रमात डॉ. अमोल राठोड व गोपाल देशमुख यांच्या उपस्थितीत गावातील सर्व ० ते ६ वयोगटातील बालकांची तपासणी करण्यात आली व त्यांना आरोग्याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

दु. २.०० वा. बौद्धिक सत्रात प्रा. अशोक सारडा, मेहकर यांनी राष्ट्रीय समस्यांवर काव्यात्मक प्रबोधन एक सुखद संवाद या विषयावर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. सुनिल खाडे हे होते.

शनिवार, २३ जानेवारी २०१४

सकाळी श्रमदानानंतर गावातून एडस् जनजागृती विषयी प्रभातफेरी काढण्यात आली व त्यानंतर एडस् जनजागृती व तपासणी या शिबीरांतर्गत डॉ. मनीष देशमुख (वैद्यकीय अधिकारी, पुसद) व राहुल गायकवाड, समुपदेशक, पुसद यांनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

दुपारी बौद्धिक सत्रात राष्ट्रीय सेवा योजनेत युवकांचे योगदान या विषयावर प्रा. प्रदीप दुधाट, रा.से.यो. क्षेत्रीय समन्वयक, पुसद यांनी विद्यार्थ्यांना रा.से.यो. माध्यमातून कोणकोणती कामे करणे शक्य आहे याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा.श्री.तुकाराम उघडे

(ज्येष्ठ नागरिक) मनसळ हे उपस्थित होते.

रविवार, २४ जानेवारी २०१६

सकाळी ७.३० ते १२.०० दरम्यान मनसळ येथील स्मशानभूमीमध्ये वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी डॉ. संजीव मोटके, प्राचार्य फु.ना.म.,पुसद व उपप्राचार्य डॉ.व्ही.पी. सोंदणकर तसेच कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. पी.बी.गायकवाड, प्रा. आनंद वडवळे हे उपस्थित होते.

दुपारी २.०० वा. बौद्धिक सत्रांतर्गत विद्यार्थी कवी संमेलन घेण्यात आले. या कविसंमेलनात व्यासपीठावर राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सचिन दत्ता ताळीकोटे, कु. स्नेहा तावडे, कु. सुषमा धोटे, शुभम महाजन, गौतम केवटे, संदीप कवडे आणि प्रा. डॉ. सुनिल खाडे हे उपस्थित होते. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्रा.डॉ.प्रियंका गायकवाड कार्यक्रम अधिकारी उपस्थित होत्या. या कवी संमेलनात सर्व शिबीरार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

सोमवार, २५ जानेवारी २०१६

सकाळी ७.३० ते ९.३० दरम्यान श्रमदानाच्या माध्यमातून प्राचार्य डॉ. संजीवजी मोटके व उपप्राचार्य डॉ. विनोद सोंदणकर यांच्या शुभहस्ते स्मशानभूमीमध्ये वृक्षारोपन करण्यात आले. सकाळी ९.३० ते १२.०० दरम्यान सिकलसेल आजार तपासणी शिबीर घेण्यात आले.

दुपारी २.०० वाजता समारोप समारंभ कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य, डॉ. सजीव मोटके हे उपस्थित होते तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विनोद सोंदणकर उपप्राचार्च, केंद्रप्रमुख श्री. मोहिते, श्री. विजय विश्वकर्मा मुख्याध्यापक , भारत कांबळे, श्री. रवी जाधव आणि कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ. प्रियंका गायकवाड, प्रा. आनंद वडवळे हे उपस्थित होते. स्वयंसेवकांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल बक्षिसाचे वितरण करण्यात आले या कार्यक्रमात प्रमुख अतिथींनी विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले आणि उज्ज्वल भविष्याकरिता सर्वांना शुभेच्छा दिल्यात.

सायंकाळी ५.३० वाजता गावकऱ्यांचा व गावातील प्रतिष्ठित नागरिकांचा निरोप घेण्यात आला.

अशा प्रकारे राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय विशेष ग्रामीण शिबीर अतिशय उत्साहात व आनंददायी

फुलसिंग नाईक महाविद्यालय पुसद
राष्ट्रीय सेवा योजना
नियमित कार्यक्रम अहवाल

सत्रारंभी राष्ट्रीय सेवा योजना विभागामध्ये स्वयंसेवक म्हणून प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांकडून आवेदन पत्र मागविण्याकरिता सूचना काढून आवेदनपत्र मागविण्यात आले व विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षात घेऊन प्रवेश निश्चित करण्यात आला.

* दि. २१ जुन २०१६ रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनानिमीत्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला योगशास्त्र प्रा. कांचन ठाकरे या उपस्थित होत्या. त्यांनी प्राध्यापकांना व विद्यार्थ्यांना विविध योगासनाची माहिती देऊन प्रात्याक्षिक करुन दाखविले शांततामय व निरोगी जिवनासाठी योगाचे असलेले महत्त्व त्यांनी प्रतिपादन केले. या वेळी कार्यक्रमाला प्रा. हरिश गजभिये, उपप्राचार्य, प्रा. एल. डी. रामटेके, उपप्राचार्य कनिष्ठ महाविद्यालय प्रा. प्रदीप राऊत, प्रा. ए. आर चिरडे प्रा. सी. आर. पोळकट. प्रा. आनंद वडवळे हे उपस्थित होते.

* दि. १ जुलै २०१६ रोजी महाविद्यालयात वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. हरीत क्रांतीचे प्रणेते कै. वसंतराव नाईक यांच्या जयंती निमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके उपस्थित होते. त्यांनी हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन केले, या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे उपप्राचार्य हरिश गजभिये, एस. डी. रामटेके, डॉ. ए.बी. पाटील, प्रा. एन. डी. खैरे, प्रा. ए. आर. चिरडे, प्रा.डॉ. हेमंत महल्ले, प्रा.डॉ. प्रल्हाद वावरे, प्रा. डॉ. कल्याण साखरकर, प्रा. प्रभाकर बोरकर, प्रा. डी. व्ही. कदम, प्रा. उल्हास चव्हाण, प्रा. महेश हंबर्डे, प्रा. डी. बी. पवार, प्रा.डॉ. संजय भोयर, प्रा.डॉ पंकज कहाते, प्रा.डॉ. बी. डी. वाटोडे, प्रा. संतोष चव्हाण प्रा.डॉ. सुनिल खाडे, प्रा. भूषण मनगटे, प्रा. एन. जे. काळे, प्रा. विलास आक्कावार, प्रा. अनिता कांबळे, प्रा. सुप्रिया हमजादे, प्रा. निता सेता प्रा. प्रियंका गायकवाड प्रा. आनंद वडवळे तसेच इतर प्राध्यापक वृंद शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व इतर विद्यार्थी यांनी या कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ. संजीव मोटके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

* दि. १ ऑगस्ट २०१६ रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे यांची जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आले या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. महेश हंबर्डे हे लाभले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. उल्हास चव्हाण यांनी भूषविले या कार्यक्रमाला प्रा. आनंद वडवळे हे उपस्थित होते.

* दि. १५ ऑगस्ट २०१६ रोजी स्वातंत्र्यदिना निमित्त ध्वजारोहणाचा कार्यक्रम घेण्यात आला. स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून रा. से. यो. विभागाच्या वतीने वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके, उपप्राचार्य हरिश गजभिये, प्रा.डॉ. कल्याण साखरकर, प्रा.डॉ. पंकज कहाते, प्रा.डॉ. आनंद वडवळे व राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक सहभागी होते.

* दि. १८ ऑगस्ट २०१६ रोजी स्व. वसंतरावजी नाईक यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित कार्यक्रमाकरिता बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय पुसद येथे २५ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला व संपूर्ण दिवस विविध कार्यक्रमात स्वयंसेवक म्हणून कार्य केले.

* दि. २१ ऑगस्ट २०१६ रोजी स्व. सुधाकरराव नाईक यांच्या जयंती निमित्त वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात महाविद्यालयाच्या मैदानावर वृक्षरोपण करण्यात आले.

* दि. ०३ सप्टेंबर २०१६ रोजी कै. फुलसिंग नाईक बापू यांच्या पुण्यतिथी निमित्त स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. या दिना निमित्त महाविद्यालयीन परिसराची साफसफाई करण्यात आली. या कार्यक्रमात रा. से. यो. च्या २०० स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

* दि. ७ सप्टेंबर २०१६ रोजी ५ सप्टेंबर शिक्षक दिनाचे औचित्य साधून स्वयंशासन दिवस कार्यक्रम घेण्यात आला. तसेच शिक्षक दिनाचे औचित्य साधून महाविद्यालयातील जेष्ठ प्रा. डॉ. बळीराम घ्यारे यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके हे उपस्थित होते. तसेच प्रा. बोरकर, प्रा. ए. बी पाटील, प्रा.डॉ. प्रियंका गायकवाड, प्रा.डॉ. आनंद वडवळे हे उपस्थित होते. तसेच स्वयंशासन दिनानिमित्त उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिस व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

* दि. १५ आक्टोबर २०१६ रोजी डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती दिनानिमित्त वाचन प्रेरणा दिवसाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ. अनिल मुडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा.डॉ. कल्याण साखरकर यांनी भुषविले.

* दि. २४ सप्टेंबर २०१६ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिनानिमित्त उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे क्षेत्रीय समन्वयक प्रा. वि. शिरसकर हे उपस्थित होते या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्याचाचे प्राचार्य डॉ. संजिव मोटके हे उपस्थित होते.

* दि. २५ सप्टेंबर २०१६ रोजी रा. से. यो. दिना निमित्त पुसद येथील हसरे घरकुलाला भेट देण्यात आली या भेटीमध्ये कपडे, आर्थिक मदत, शैक्षणिक साहित्य इ. जिवनावश्यक वस्तू भेट देण्यात आल्या.

* दि. २ ऑक्टोबर २०१६ रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ. अनिल मुडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. कल्याण साखरकर यांनी भुषविले.

* दि. ११ ऑक्टोबर २०१६ या रोजी जागतिक बालिका दिन साजरा करण्यात आला. या दिनानिमित्त 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या अभियाना संदर्भात विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

* दि. ८ ऑक्टोबर २०१६ रोजी मतदान जनजागृती व मतदार नाव नोंदणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये ज्या विद्यार्थ्यांचे १८ वर्षे वय पूर्ण झालेले आहेत. नंतर त्यांची नावे मतदार यादी मध्ये समाविष्ट नाहीत अशा विद्यार्थ्यांचे नाव नोंदवून घेण्यात आले व मतदान विषयक जनजागृती करण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रेरित करण्यात आले.

* दि. २६ नोव्हेंबर २०१६ रोजी भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य संजीव मोटके, प्रा. विलास भवरे

प्रा.डॉ.प्रियंका गायकवाड हे उपस्थित होते संविधान दिनानिमित्त सर्व विद्यार्थ्यांना संविधानाची प्रत देऊन शपथ देण्यात आली.

* दि. १ डिसेंबर २०१६ रोजी जागतिक एड्स दिना निमित्त जनजागृती रॅली काढण्यात आली. ही जन जागृती रॅली उपजिल्हा रुग्णालयात येथून तहसिल कार्यालयापर्यंत नेण्यात आली. या रॅली मध्ये महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक व इतर विद्यार्थी उपस्थित होते.

* दि. ६ डिसेंबर २०१६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिवर्तन दिनानिमित्त आठरा तास अभ्यास करण्याचा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमाना महाविद्यालयातील सहाशे विद्यार्थ्याचा प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा.डॉ. विलास भवरे प्रा.डॉ. वसंत कांबळे, प्रा. प्रियंका गायकवाड व प्रा. आनंद वडवळे यांनी केले होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

* दि. १० डिसेंबर २०१६ संत गाडगेबाबा यांच्या पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्रा.डॉ. प्रियंका गायकवाड व प्रा.डॉ. आनंद वडवळे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

* दि. ३१ डिसेंबर २०१६ रोजी तंबाखु मुक्त जीवन संकल्प दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रा. डी. बी. पवार हे मार्गदर्शक म्हणून लाभले होते. या कार्यक्रमाला प्रा. प्रियंका गायकवाड व प्रा. आनंद वडवळे आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते

* दि. १ जानेवारी २०१३ क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाला डॉ. सुनिल खाडे प्रा. प्रियंका गायकवाड व आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते

* दि. १२ जानेवारी २०१७ रोजी युवक दिन साजरा करण्यात आला. राष्ट्रमाता जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त हा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ. आनंद वाघमारे प्रा. इंगळे हे उपस्थित होते या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डी. बी. पवार यांनी भुषविले या कार्यक्रमाचे नियोजन प्रा.डॉ. आनंद वडवळे व प्रा.डॉ. प्रियंका गायकवाड यांनी केले होते.

* दि.२६ जानेवारी २०१६ रोजी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहनाचा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमानंतर व राष्ट्रीय सेवा योजनेच्या सर्व स्वयंसेवक व स्वयंसेविकांचे सामुहिक छायाचित्र घेण्यात आले.

* दि. २५ जानेवारी २०१४ रोजी राष्ट्रीय मतदार दिवसानिमित्त मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीमध्ये मा. श्री संजय गरकल तहसिलदार, पुसद यांचा सहभाग होता. या रॅलीची सुरुवात तहसिल कार्यालय पुसद येथुन करण्यात येवून ही रॅली सुभाष चौक शिवाजी चौक, वसंतराव नाईक चौक व मुखरे चौक मार्गे पुन्हा तहसिल कार्यालयापर्यंत नेण्यात आली.

* दि. २२ जानेवारी २०१७ रोजी बळीराजा चेतना अभियान रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही रॅली वणी येथील प्रा. दिलीप अलोणे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली प्रा. दिलीप आलोणे व त्यांच्या पथकाने पथनाट्यातून बळीराजा शेतकऱ्यांमध्ये जनजागृती घडवून आणण्यासाठी कार्यक्रम घेतले. या रॅलीच्या उद्घाटनाला मा. सौ . अनिता नाईक नगराध्यक्ष, पुसद. मा. श्री संजय गरकल तहसिलदार पुसद. प्राचार्य गणेश पाटील, प्रा. विवेक सिरसकर, प्रा. भागवत, प्रा. महल्ले व प्रा.डॉ. आनंद वडवळे व राष्ट्रीय सेना योजनेचे सर्व महाविद्यालयातील स्वयंसेवक उपस्थित होते

यानंतर ही रॅली फुलसिंग नाईक महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिर स्थळी नेण्यात आली. शिबिर स्थळ मनसळ ता. पुसद येथे गावामध्ये पथनाट्यातून जनजागृती करण्यात आली.

* दि. १९ फेब्रुवारी २०१७ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण मा. प्राचार्य डॉ. संजीव मोटके यांनी केला. या कार्यक्रमाला प्रा. चिरडे, प्रा. राऊत, प्रा. राठोड, प्रा. ए. बी. पाटील, प्रा. हमजादे , प्रा. नरवाडे प्रा. आडे, प्रा.डॉ. प्रियंका गायकवाड, प्रा. हमजादे मॅडम, प्रा.डॉ. वडवळे व राष्ट्रीय सेवायोजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

* दि. २० फेब्रुवारी २०१४ रोजी महाराष्ट्र हरित सेनेचे सदस्य होवून पर्यावरण्याचे संरक्षण करण्याबाबत विद्यार्थी स्वयंसेवक व प्राध्यापक यांच्या नाव नोंदणीच्या कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाअंतर्गत २००

विद्यार्थ्यांना सहभागी करुन घेण्यात आले.

* दि. २३ फेब्रुवारी २०१७ रोजी संत गाडगेबाबा जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजीव मोटके, प्रबंधक श्री उमेश चव्हाण, प्रा. दवणे प्रा.डॉ. कलकोटे मॅडम, प्रा. कांबळे मॅडम, प्रा. हमजादे मॅडम प्रा. आनंद वडवळे, प्रा. राऊत, प्रा. जाधव, प्रा. वाघमारे

राष्ट्रीय सेवा योजना
विशेष शिबीर अहवाल सत्र २०१६-१७

फुलसिंग नाईक महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि. १८ डिसेंबर २०१६ ते २५ डिसेंबर २०१६ पर्यंत मौजे मनसळ ता. पुसद जि. यवतमाळ येथे ७ दिवसीय विशेष शिबिराचे आयोजन करुन उत्साहात संपन्न झाले. रविवार दि. १८ डिसेंबर २०१६ शिबिराचे स्थळी आगमन झाले. शिबिर परिसराची स्वच्छता व राहण्याची व्यवस्था करण्यात आली. त्यानंतर गावकऱ्यांमध्ये श्रमदाना विषयी चर्चा करण्यात आली. या दिवशी रात्री स्वयंसेवकांचे गट करण्यात आले. त्यात त्यांना सात दिवसात कोणकोणते काम पार पाडावयाचे आहे या बाबत मार्गदर्शन करण्यात आले.

* सोमवार दि. १९ डिसेंबर २०१६

सकाळी ९.०० ते १२.३० या दरम्यान श्रमदान करण्यात आले. दुपारी भोजनानंतर उद्घाटन समारंभाचा कार्यक्रम घेण्यात आला. त्या कार्यक्रमाला मा. डॉ. संजीव मोटके अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. अरविंद मुढे (आय.एफ. एस.), उपवनसंरक्षक पुसद वनविभाग यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणुन सौ. कविता उघडे पोलिस पाटील मनसळ, श्रीमती सुंदराबाई उघडे उपसरपंच, उपप्राचार्य, हरिश गजभिये फुलसिंग नाईक महाविद्यालय पुसद, श्री विजय विश्वकर्मा, मुख्याध्यापक जि. प. प्रा. शाळा मनसळ व कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. प्रियंका गायकवाड व डॉ.प्रा. आनंद वडवळे हे उपस्थित होते.

* मंगळवार दि. २० डिसेंबर २०१६

सकाळी २.३० वाजता एड्स जनजागृती प्रभात फेरी काढण्यात आली. व त्यानंतर दु. १२.३० पर्यंत श्रमदान घेण्यात आले. या श्रनदान गावात शौच्य खड्ड्याची निर्मिती करण्यात आली, दुपारी बौद्धिक सत्रात प्रा. उल्हास चव्हाण यांनी एड्स जनजागृती व संसर्गजन्य आजार याविषयांवर विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले.

* बुधवार दि. २१ डिसेंबर २०१६

सकाळी ८.३० ते १२.३० या दरम्यान श्रमदान घेण्यात आले. दुपारी बौद्धिक सत्रात 'जिओ और जिने दो' या विषयांवर प्रा. प्रविण दुधाट यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. कल्याण साखरकर यांनी भुषविले.

* गुरुवार दि. २० डिसेंबर २०१६

सकाळी ८.३० ते ९.३० वाजता श्रमदान घेण्यात आले. सकाळी ९.३० वाजता डॉ. जय भोपी, श्री वरद नेत्रालय, पुसद यांच्या मार्गदर्शनाखाली गावकऱ्यांनी मोफत नेत्रतपासणी करण्यात आली. गरजूंना मोफत औषधाचे वाटप करण्यात आले. डॉ. जय भोपी यांनी गावकऱ्यांना व विद्यार्थ्यांना डोळ्याचे आजार व त्याविषयी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले.

दुपारी बाद्धीक सत्रात प्रा. विवेक सिरसकर यांनी ग्रामीण विकासात लोकसहभागाचे महत्त्व व राष्ट्रीय सेवा योजनेची भूमिका या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी डॉ. श्री. ए. बी. पाटील हे उपस्थित होते.

* शुक्रवार दि. २३ डिसेंबर २०१६ सकाळी ८.०० ते ९.३० या दरम्यान श्रमदान घेण्यात आले ९.३० ते १२.३० या दरम्यान डॉ. सिमा महल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली बाल व स्त्री आरोग्य शिबीर घेण्यात आले.

दुपारी बौद्धीक सत्रात भारतीय शेती व शेतकऱ्यांची स्थिती या विषयांवर श्री स्वप्नील देशमुख यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी डॉ. सुनिल खाडे हे होते.

* शनिवार दि. २४ डिसेंबर २०१६ सकाळी ९.०० ते १२.३० या दरम्यान श्रमदान घेण्यात आले दुपारी बौद्धीक सत्रात विद्यार्थी कवी संम्मेलनाचे आयोजन करण्यात आले या कार्यक्रमाला प्रा. विलास भवरे, प्रा. महेश हबर्डे, किरण पतंगे, गजानन चव्हाण, शंकर पाटील, सज्जन बरडे, दिलीप बनसोड, गजानन दामोधर ,खंडागळे महाराज, कोंडबा धुळधुळे, सुरेश दामोदर, विजय गायकवाड, धर्मदास अमृत, सुनिल खाडे इ. कवी उपस्थित होते.

* रविवार दि. २५ डिसेंबर २०१६ सकाळी १०.०० ते १२.३० श्रमदान घेण्यात आले दुपारी २.०० वाजता शिबिर समारोपाचा कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती डॉ. अविनाश वानखेडे यांची होती. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान उपप्राचार्य हरीश गजभिये यांनी भुषविले, तसेच प्राचार्य, डॉ. संजीव मोटके प्राचार्य फु. ना. म. पुसद, तुकाराम उघड, सुंदराबाई उघडे व गावातील गावकरी मंडळी उपस्थित होते. सायंकाळी ५.३० वाजता गावक-यांचा व गावातील प्रतिष्ठित नागरिकांचा निरोप घेण्यात आला.

अशा प्रकारे राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबीर अतिशय उत्साहात व आनंददायी वातावरणात संपन्न झाला राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवशीय शिबीर यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. संजीव मोटके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम अधिकारी

प्रा. डॉ. प्रियंका गायकवाड, प्रा. डॉ. आनंद वडगळे यांच्या नेतृत्वात यशस्वी होण्यासाठी रा. से. यो. सल्लागार समिती फुलसिंग नाईक महाविद्यालय, पुसद रा. से. यो. प्रतिनिधी, स्वयंसेवक व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेत्तर कर्मचारी आदींचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाधिकारी
प्रा. डॉ. प्रियंका गायकवाड
प्रा. डॉ. आनंद गायकवाड
राष्ट्रीय सेवा योजना
फुलसिंग नाईक म. पुसद

Phulsing Naik Mahvidyalaya Pusad National Cadet Corps (N.C.C.) Annual Report 2016-17

N.C.C. works for the all-round development of the cadets. The training imparts them physical fitness and broadness of mind. The cadets can easily face the problems of life in every. walk of life.

It helps to develop qualites of character, courage, discipline, comradeship, leadership, secular outlook, spirit of adventure among the cadets.

SUO Shankar Sunil Girhe, JUO Vaibhav Shriram Harne, JUO Pradip Pandurang Jadhao, JUO Vikram Ramrao Chavhan were selected for the Trekking camp at Gujrat.

SGT Umesh Ramesh Chavhan And SGT Dipali Bhaskar Gangavane were selected for the group competition Republic Day Parade Camp at Aurangabad.

SGT Rushikesh Sanjay Chavhan And SGT Chechenath Bhopi Pawar were selected for the advance TSC camp at Amaravati.

SGT Kalyani Parpalliwar, JUO Pooja Dhuldhule, JUO Vaishanavi Parpalliwar were selected for the advance TSC camp at Pune.

This year 80 SD cadets 40 SW cadets participated in various camps organised in different parts of the country.

Yoga day was celebrated with great enthusiasm on 21 st June 2016 in Koshatwar Vidyalaya, Pusad.